| | | सुनावणीचा दि.29.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 1531/2021 | श्री. किरण नारायण ननवरे, मु.पो. पाडळसिंगी ता. गेवराई जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 2 | 1535/2021 | श्री. किरण नारायण ननवरे, मु.पो. पाडळसिंगी ता. गेवराई जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 3 | 1536/2021 | श्री. किरण नारायण ननवरे, मु.पो. पाडळसिंगी ता. गेवराई जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 4 | 2087/2021 | श्री. सय्यद युनुस सय्यद मन्नन, मु.पो. पार्डी मक्त ता. अर्धापुर जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | उप सचिव राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 5 | 8323/2021 | श्री. भागवत आत्माराम पुपलवाड, मु.पो. पाटोदा ता. नायगाव जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 6 | 8324/2021 | श्री. भागवत आत्माराम पुपलवाड, मु.पो. पाटोदा ता. नायगाव जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 7 | 12874/2021 | श्री. इलाही बशीरसाब शेख, रा. साहेल नगर, जुना एम. आय.डी.सी. रोड लातुर | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडठपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 8 | 12142/2021 | कुणाल सुरेशराव पिंपळे, रा. कावळे गल्ली ह.मु. नारळा पैठण ता.पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 9 | 8091/2021 | कुणाल सुरेशराव पिंपळे, रा. कावळे गल्ली ह.मु. नारळा पैठण ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उप सचिव राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 10 | 2341/2022 | श्री. यशवंत विठ्ठल पवार, रा. कर्जत जुने एस.टी. स्टॅंड, राजलक्ष्मी टाऊनशिप, बिल्डिंग क्रं. 05, गाळा क्रं. 01 पो. गुंडगे ता.कर्जत जि. रायगड-410201 | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर ND | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.29.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 3034/2022 | श्री. अशोक विश्वनाथ नवघरे, रा. सिंचन नगर, परभणी-431401 | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 12 | 1910/2024 | श्री. प्रदिप बाबुलाल भारुका, रा. भारुका मेडीकल मेन रोड, कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 13 | 1873/2024 | श्री. संतोष शंकरराव वाघलव्हाळे, रा. चौका ता.जि. छत्रपती संभाजीनगर | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 14 | 195/2021 | श्री. पंढरिनाथ बाबाराव आरदवाड, व्दारा. कल्याणपाड याचं निवास्थान, शहाजी नगर, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 15 | 349/2022 | श्री. पंढरिनाथ बाबाराव आरदवाड, व्दारा. कल्याणपाड निवासस्थान, शहाजी नगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 16 | 350/2022 | श्री. पंढरिनाथ बाबाराव आरदवाड, व्दारा. कल्याणपाड निवासस्थान, शहाजी नगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 17 | 365/2022 | श्री. पंढरिनाथ बाबाराव आरदवाड, व्दारा. कल्याणपाड निवासस्थान, शहाजी नगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 18 | 1589/2022 | श्री. पंढरीनाथ बाबाराव आरदवारा, व्दारा. कल्याणपाड निवास्थान शहाजी नगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 19 | 2212/2022 | श्री. राजेंद्र मधुकरराव बरके, रा. लक्ष्मीनगर गल्ली किल्ले धारुर ता. किल्ले धारुर जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 20 | 2225/2022 | श्री. राजेंद्र मधुकरराव बरके, रा. लक्ष्मीनगर गल्ली किल्ले धारुर ता. किल्ले धारुर जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.29.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 2226/2022 | श्री. राजेंद्र मधुकरराव बरके, रा. लक्ष्मीनगर गल्ली किल्ले धारुर ता. किल्ले धारुर जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 22 | 2227/2022 | श्री. राजेंद्र मधुकरराव बरके, रा. लक्ष्मीनगर गल्ली किल्ले धारुर ता. किल्ले धारुर जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 23 | 7987/2021 | श्री. राजेंद्र मधुकरराव बरके, रा. लक्ष्मीनगर गल्ली किल्ले धारुर ता. किल्ले धारुर जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | उपसचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 24 | 2321/2024 | श्री. राजेंद्र मधुकरराव बरके, रा. लक्ष्मीनगर गल्ली किल्ले धारुर ता. किल्ले धारुर जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 25 | 2322/2024 | श्री. राजेंद्र मधुकरराव बरके, रा. लक्ष्मीनगर गल्ली किल्ले धारुर ता. किल्ले धारुर जि. बीड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 26 | 4365/2024 | श्री. मोतीराम गयबु काळे, मु.जानापुरी पो. वडेपुरी (एस.आर.टी), ता. लोहा जि. नांदेड | कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 27 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 28 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 29 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 30 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - १५३१/२०२१**
**बोर्ड क्र.०१**

श्री.किरण नारायण नंनवरे, — अपिलार्थी
रा.पाडळसिंगी, ता.गेवराई, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१७.०२.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे हे राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२४.०९.२०२० रोजीच्या ऑनलाईन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, राज्य माहिती आयोग, औरंगाबाद अंतर्गत सन ०१.०१.२०१७ ते माहिती देईपर्यंत कलम १९ (३) अन्वये दाखल झालेल्या व्दितीय अपिलावरील पारित केलेले निर्णय, आदेश माहिती मिळणे, अशी माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे संबंधितांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलासोबत सादर केलेल्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.२४.०९.२०२० रोजीचा असुन सदर माहिती अर्ज अपिलार्थी यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला आहे. या संदर्भात असे अवगत करण्यात येते की, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे तांत्रिक दृष्टीकोनातून दि.०९.०३.२०२१ पासुन लॉगइन व पासवर्डसह ऑनलाईन सुविधा कार्यान्वयित झालेली आहे. अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज यापूर्वीचा असुन या कालावधीमध्ये ऑनलाईन सुविधा कार्यान्वयित नसल्यामुळे या प्रकरणातील अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अवगत झाला असुन या माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. सदर मागणी केलेली माहिती आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी सदर संकेतस्थळावर आयोगाने पारित केलेले निर्णय या सदराखाली संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात. या उपरही अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी त्यांचेशी संबंधित व्दितीय अपिलांचे क्रमांक व सुनावणीचा दिनांक इ.तपशिल उपलब्ध करुन दिल्यास त्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर प्रथम अपिलाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाव्दारे आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी संकेतस्थळावर संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरेल. तसेच याउपरही अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी त्यांचेशी संबंधित व्दितीय अपिलाचे क्रमांक व सुनावणीचा दिनांक इ. पुरक तपशिल जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावा. अपिलार्थी यांनी असा पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यानंतर त्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत, माहिती अर्जाव्दारे हव्या असलेल्या माहितीचा नेमका संदर्भ जसे व्दितीय अपिलाचा क्रमांक (अपिलार्थी यांचेशी संबंधित) व सुनावणीचा दिनांक इ. पुरक संदर्भ जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावा. अपिलार्थी यांनी त्यांचेशी संबंधित असा पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील पंधरा दिवसात वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेऊन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७.(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह कळविण्यात यावे. तसेच अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी नमूद कालावधीत त्यांचेशी संबंधित नेमका पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहितीचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. १५३१/२०२१/एस/ 8267 दिनांक :- 9/5/24

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १५३५/२०२१**
**बोर्ड क्र.०२**

श्री.किरण नारायण नंनवरे,
रा.पाडळसिंगी, ता.गेवराई, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१७.०२.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सुरवडे हे राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२५.०९.२०२० रोजीच्या ऑनलाईन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, राज्य माहिती आयोग, औरंगाबाद अंतर्गत सन ०१.०१.२०१७ ते माहिती देईपर्यंत कलम १८ (अवमान याचिका) नुसार जन माहिती अधिकारी, सहायक जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना शास्ती, दंड व कार्यवाही झालेल्या अधिकाऱ्यांची यादी नावे पद व कार्यालयसह वर्षनिहाय माहिती सीडी किंवा पेन ड्राईव्ह मध्ये पीडीएफ स्वरुपात, अशी माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे संबंधितांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलासोबत सादर केलेल्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.२५.०९.२०२० रोजीचा असुन सदर माहिती अर्ज अपिलार्थी यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला आहे. या संदर्भात असे अवगत करण्यात येते की, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे तांत्रिक दृष्टीकोनातून दि.०९.०३.२०२१ पासुन लॉगइन व पासवर्डसह ऑनलाईन सुविधा कार्यान्वयित झालेली आहे. अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज यापूर्वीचा असुन या कालावधीमध्ये ऑनलाईन सुविधा कार्यान्वयित नसल्यामुळे या प्रकरणातील अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अवगत झाला असुन या माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. सदर मागणी केलेली माहिती आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी सदर संकेतस्थळावर वार्षिक अहवाल या सदराखाली संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात. या उपरही अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता

असल्यास त्यांनी त्यांचेशी संबंधित कलम १८ अंतर्गत तक्रारीचा क्रमांक व सुनावणीचा दिनांक इ.तपशिल उपलब्ध करुन दिल्यास त्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर प्रथम अपिलाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाव्दारे आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी संकेतस्थळावर संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरेल. तसेच याउपरही अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी त्यांचेशी संबंधित कलम १८ अंतर्गत तक्रार क्रमांक व सुनावणीचा दिनांक इ. पुरक तपशिल जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावा. अपिलार्थी यांनी असा पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यानंतर त्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत, माहिती अर्जाव्दारे हव्या असलेल्या माहितीचा नेमका संदर्भ जसे कलम १८ अंतर्गत तक्रार क्रमांक (अपिलार्थी यांचेशी संबंधित) व सुनावणीचा दिनांक इ. पुरक संदर्भ जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावा. अपिलार्थी यांनी त्यांचेशी संबंधित असा पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील पंधरा दिवसात वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेऊन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह कळविण्यात यावे. तसेच अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी नमूद कालावधीत त्यांचेशी संबंधित नेमका पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहितीचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. १५३५/२०२१/एस/ 8268 दिनांक : 9/5/24

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १५३६/२०२१**
**बोर्ड क्र.०३**

श्री.किरण नारायण नंनवरे, — अपिलार्थी
रा.पाडळसिंगी, ता.गेवराई, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१७.०२.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे हे राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२४.०९.२०२० रोजीच्या ऑनलाईन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, राज्य माहिती आयोग, औरंगाबाद अंतर्गत पारित झालेले निर्णय, अवमान याचिका वरील दंड, शास्ती माहितीचा कालावधी सन ०१.०१.२०१७ ते माहिती देईपर्यंत, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना मागवलेल्या खुलाशाच्या प्रती पीडीएफ फाईल मध्ये सीडी किंवा पेन ड्राईव्ह स्वरुपात द्यावी, अशी माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे संबंधितांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलासोबत सादर केलेल्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.२४.०९.२०२० रोजीचा असुन सदर माहिती अर्ज अपिलार्थी यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला आहे. या संदर्भात असे अवगत करण्यात येते की, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे तांत्रिक दृष्टीकोनातून दि.०९.०३.२०२१ पासुन लॉगइन व पासवर्डसह ऑनलाईन सुविधा कार्यान्वयित झालेली आहे. अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज यापूर्वीचा असुन या कालावधीमध्ये ऑनलाईन सुविधा कार्यान्वयित नसल्यामुळे या प्रकरणातील अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अवगत झाला असुन या माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची असून ती त्रयस्थ अधिकारी यांचेशी संबंधित आहे. संबंधित अधिकारी यांनी सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने त्या त्या वर्षामध्ये पारित केलेल्या निर्णयाचा एकत्रित अहवाल वार्षिक अहवालाच्या अनुषंगाने मुख्यालयास सादर करण्यात येतो व आवश्यक कार्यवाहीअंती असा वार्षिक अहवाल मुख्यालयाकडुन संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतो. त्यामुळे अपिलार्थी आयोगाच्या <u>www.sic.maharashtra.gov.in</u> या

संकेतस्थळावर वार्षिक अहवाल या सदराखाली संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात. याउपर अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर प्रथम अपिलाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. तसेच सदर मागणी केलेली माहिती म्हणजे खुलाशाची प्रत ही बाब संबंधित त्रयस्थ अधिकारी यांची वैयक्तिक स्वरुपाची असून ती आयोग व संबंधित अधिकारी यांच्यामधील विश्वासअर्हतेशी संबंधित आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या अशा माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. त्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही. मात्र सदर प्राप्त / अप्राप्त खुलाशाच्या अनुषंगाने आयोगाने पारित केलेल्या निर्णयाची प्रत अपिलार्थी यांना देय होईल. अपिलार्थी यांनी मोघमपणे दि.०१.०१.२०१७ पासुनची माहिती मागितलेली असुन अशी माहिती विस्तृत स्वरुपाची आहे म्हणून अपिलार्थी यांनी त्यांचेशी संबंधित व्दितीय अपिलांचे क्रमांक व सुनावणीचा दिनांक इ. पुरक तपशिल जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावा. अपिलार्थी यांनी असा पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यानंतर, त्या अनुषंगाने संबंधित प्रकरणात प्राप्त / अप्राप्त खुलाशाच्या अनुषंगाने आयोगाने पारित केलेल्या निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत, माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांचेशी संबंधित व्दितीय अपिलांचा क्रमांक व सुनावणीचा दिनांक इ. पुरक संदर्भ जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावा. अपिलार्थी यांनी त्यांचेशी संबंधित असा पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील पंधरा दिवसात वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी नमूद व्दितीय अपिलामध्ये प्राप्त / अप्राप्त खुलाशाच्या अनुषंगाने आयोगाने पारित केलेल्या निर्णयाची प्रत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह कळविण्यात यावे. तसेच अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी नमूद कालावधीत त्यांचेशी संबंधित नेमका पुरक संदर्भ उपलब्ध करुन दिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहितीचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. १५३६/२०२१/एस/8269 दिनांक :- 9/5/24

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - २०८७/२०२१
बोर्ड क्र.०४

श्री.सय्यद युनूस सय्यद मन्नान, — अपिलार्थी
रा.पार्डी मक्ता, ता.अर्धापूर, जि.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२४.०२.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०१.१०.२०२० रोजीच्या ऑनलाईन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, मा. दि.धारुरकर, राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद रुजू झाल्यापासुन नांदेड जिल्ह्यातील माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार व्दितीय अपिलावर व तक्रारीवर झालेले दंड, शास्ती निर्णय मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलासोबत सादर केलेल्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.०१.१०.२०२० रोजीचा असुन सदर माहिती अर्ज अपिलार्थी यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला आहे. या संदर्भात असे अवगत करण्यात येते की, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे तांत्रिक दृष्टीकोनातून दि.०९.०३.२०२१ पासुन लॉगइन व पासवर्डसह ऑनलाईन सुविधा कार्यान्वयित झालेली आहे. अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज यापूर्वीचा असुन या कालावधीमध्ये ऑनलाईन सुविधा कार्यान्वयित नसल्यामुळे या प्रकरणातील अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अवगत झाला असुन या माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांना नांदेड जिल्ह्याशी संबंधित माहिती हवी आहे. तथापि अपिलार्थी यांनी ज्या स्वरुपात माहितीची मागणी केलेली आहे ती त्या स्वरुपात कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करण्यात येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र त्या त्या वर्षामध्ये शास्ती अंतिम केलेल्या प्रकरणाचा एकत्रित अहवाल वार्षिक अहवालाच्या अनुषंगाने मुख्यालयास सादर करण्यात येतो व आवश्यक कार्यवाहीअंती असा वार्षिक अहवाल मुख्यालयाकडुन संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतो. त्यामुळे अपिलार्थी आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वार्षिक अहवाल या सदराखाली संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त

करुन घेऊ शकतात.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर प्रथम अपिलाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे नांदेड जिल्ह्याशी संबंधित व्दितीय अपील / तक्रार प्रकरणात झालेले दंड, शास्ती निर्णयाची मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांनी ज्या स्वरुपात माहितीची मागणी केलेली आहे ती त्या स्वरुपात कार्यालयाकडुन संकलित / एकत्रित करण्यात येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अवगत केलेले आहे. मात्र त्या त्या वर्षामध्ये व्दितीय अपील / तक्रार प्रकरणात शास्ती अंतिम केलेल्या प्रकरणाचा एकत्रित अहवाल वार्षिक अहवालाच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतो. त्यामुळे अपिलार्थी यांनी वर नमूद संकेतस्थळावर संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. २०८७/२०२१/एस/8270 दिनांक : 9/5/24

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८३२३ व ८३२४/२०२१ (०२)**
**बोर्ड क्र.०५ व ०६**

श्री.भागवत आत्माराम पुपलवाड, — अपिलार्थी
रा.पाटोदा, ता.नायगाव, जि.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२६.०८.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०५ | ११.०३.२०२१ | भागवत आत्माराम पुपलवाड मु.पो.पाटोदा, ता.नायगाव जि.नांदेड यांनी १. दि.१४.०५.२०१९ रोजी एकूण सात व्दितीय अपील दाखल केले, कलम १८ नुसार २. दि.२४.०६.२०१९ ची तक्रार, ३. दि.१४.०५.२०१९ ची तक्रार, ४. दि.११.११.२०१९ ला ५५ तक्रारी, ५. दि.२७.०२.२०२० ला पोस्टाने सहा तक्रारी अशा एकूण ५५ तक्रारी व ७ अपील राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद कार्यालयात स्वत: येऊन दाखल केले आहे पण सदर प्रकरणाची सुनावणी निकाल याची माहिती, |
| ०६ | ११.०३.२०२१ | राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद यांनी अपील क्र.२३१५/२०१७, २३१७/२०१७, २३२० ते २३२५/२०१७ एकूण सहा अपील आदेश, ४४२५/२०१६, ४८८०/२०१६ दि.०७.१२.२०१७ चे सुनावणी निकाल, ४८८१/२०१७ दि.२०.०३.२०१८ चे निकाल, १५२३/२०१८ सुनावणी निकाल दि.२३.०४.२०१८, ५८८/२०१८ सुनावणी निकाल दि.२४.०४.२०१८, ६३७४/२०१८, ६३७५/२०१८ सुनावणी निकाल दि.१७.१२.२०१८ अशा एकूण १५ अपिलाच्या निकालाच्या प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या बोर्ड क्र.०५ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन सात

व्दितीय अपिलावर दि.१०.०७.२०१९ रोजी आयोगासमोर सुनावणी झालेली असुन या संदर्भातील निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन आयोगाने दिलेले निर्णय या सदराखाली प्राप्त करुन घेण्याचे व माहिती अर्जात नमूद ५५ तक्रारी प्रलंबित असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तसेच बोर्ड क्र.०६ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी, माहिती अर्जात नमूद ०९ व्दितीय अपिलांवर आयोगाने पारित केलेले निर्णय www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थवर उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस कळवून अपील क्र.६३७४/२०१८ व ६३७५/२०१८ या दोन व्दितीय अपिलांचे निर्णय अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन दिलेले आहेत. अपिलार्थी यांना त्यांच्या दोनही माहिती अर्जाव्दारे उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले नसल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित राहुन अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरेल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत, कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहुन माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली याबाबत जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी अपूर्ण माहितीबाबत अवगत केल्यानंतर त्या अनुषंगाने अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भात वस्तुस्थिती वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार व्यक्तिश: विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह कळविण्यात यावे. तसेच अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे नमूद कालावधीमध्ये अपिलार्थी कार्यालयात उपस्थित न राहिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहितीचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. ८३२३ व ८३२४/२०२१/एस/ 8270 दिनांक : 9/5/24

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - १२८७४/२०२१**
**बोर्ड क्र.०७**

श्री.ईलाशी बशिरसाब शेख, — अपिलार्थी
रा.सोहेल नगर, जुना एम.आय.डी.सी. रोड, लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२४.०२.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०९.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, ईलाही बशीरसाब शेख यांचे व्दितीय अपील कलम १९ (३) नुसार जोडपत्र क नियम ५ (२) वर अनुक्रमांक १, २, ३, ४, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४ सन २०१९-२०२०-२०२०-२०२१ आपल्या कार्यालयाने सादर केलेली टिपणी, मंजूर केलेली टिपणी व त्यानंतर झालेली चौकशी अहवाल, झालेली कार्यवाही तसेच देण्यात आलेल्या आदेशाची सत्यप्रती मिळाव्या, अशी माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात व्दितीय अपिलांचे क्रमांक नमूद केलेले नाहीत. म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, व्दितीय अपिलांचे क्रमांक पत्र प्राप्त झाल्यापासुन आठ दिवसात कळवावे अन्यथा माहितीची आवश्यकता नाही असे समजून माहितीचा अर्ज निकाली काढण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तथापि सदर पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्यांना सुचित केल्याप्रमाणे व्दितीय अपिलांचे क्रमांक उपलब्ध करुन दिलेले नाहीत त्यामुळे त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, व्दितीय अपिलांचे क्रमांक उपलब्ध करुन देणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलांचे क्रमांक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन

दिली असल्याचे दिसून येत नाही. सबब, अपिलार्थी यांना आता माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.वि.अ. १२८७४/२०२१/एस/ 8272 दिनांक : 9/5/24

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १२१४२ व ८०९१/२०२१ (०२)**
**बोर्ड क्र.०८ व ०९**

कुणाल सुरेशराव पिंपळे,
रा.कावळे गल्ली, ह.मु.नारळा, पैठण, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२६.०८.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ०८ | २८.०९.२०२१ | १. आपल्या कार्यालयात दिनांक १५.०७.२०२१ रोजी दिलेल्या निवेदनावर झालेल्या दैनंदिन टिपणे, सादरीकरण व संबंधित आस्थापना शाखा यांच्या व इतर प्राधिकरणाकडुन झालेल्या कार्यवाहीची लेखी सविस्तर कारणमिमांसासहित अचुक माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात यावी,<br>२. प्रकरणात दि.१५.०७.२०२१ रोजी दिलेल्या निवेदन अर्जावर कार्यवाही झाली नाही म्हणून स्मरणपत्र-१ दिनांक ०६.०९.२०२१ रोजी दिलेले आहे, त्या अनुषंगाने सादरच्या स्मरणपत्र याबाबत झालेली दैनंदिन कार्यवाहीची माहिती, |
| ०९ | ०१.०३.२०२१ | १. आपल्या कार्यालयात दि.१७.१२.२०२० रोजी व्दितीय अपील क्र.५०३२/२०१९, सुनावणी दि.१३.०२.२०२० च्या आदेशाची प्रत तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी, यासाठी निवेदन दिले आहे, सदरच्या निवेदन अर्जावर आपल्या कार्यालयीन आस्थापना नुसार झालेल्या दैनंदिन कार्यवाहीची माहिती,<br>२. आपल्या कार्यालयीन स्तरावर व्दितीय अपील क्र.४३६९/१९ याबाबत विना जा. क्रमांक व दिनांक नमूद न करता प्रकरणात अहवाल सादर केला आहे, याची दखल घेऊन परिपत्रक क्र.मु.मा.अ.२०२०/प्रक्र.०४/०२, दि.१४ जानेवारी २०२० प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | | विरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे देण्यात यावी, ३. आपल्या कार्यालयात दि.१६./१७./११/२०२० RM३६१३५९००२IN रजि.पोस्टाने व्दितीय अपील क्र.४४८८/२०१९, अ.क्र.४४२७/२०१९, अ.क्र.५७८९/२०१९, अपील क्र.४६४०/२०१९ च्या प्रशासकीय चुक दुरुस्त करुन मिळणेबाबत निवेदन दिले असुन सदरच्या निवेदन अर्जावर झालेल्या दैनंदिन कार्यवाही व त्याबाबत शुध्दीपत्रक / आदेश अर्जदारास केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली बोर्ड क्र.०८ मधील माहिती अर्जातील माहिती सविस्तर कारणमिमांसेसहित उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच बोर्ड क्र.०९ मधील माहिती अर्जातील माहिती चुकीची दिलेली आहे. म्हणून मागणी केलेली माहिती सविस्तर कारणमिमांसेसहित मागणी केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.०८ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती निरंक असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तसेच बोर्ड क्र.०९ मधील माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी तीन विषयाची माहिती मागितलेली आहे. म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१७.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र माहिती अधिकार सुधारणा नियम २०१२ नुसार प्रथम विषयाची माहिती देय होत असल्यामुळे प्रथम विषयाची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम विषयाची माहिती निरंक असल्यामुळे तसे अपिलार्थी यांना कळवून उर्वरित विषयांच्या माहितीकरिता स्वतंत्र अर्ज करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दोन मुद्यांची माहिती सविस्तर कारणमिमांसासहित दिलेली नाही / चुकीची माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत, कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहुन माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली नेमकी कोणती माहिती सविस्तर कारणमिमांसेसहित मिळाली नाही व चुकीची मिळाली याबाबत जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी अवगत केल्यानंतर त्या अनुषंगाने अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेऊन अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भात वस्तुस्थिती वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार व्यक्तिश: विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह कळविण्यात यावे. तसेच अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे नमूद कालावधीमध्ये अपिलार्थी कार्यालयात उपस्थित न राहिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहितीचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.१२१४२ व ८०९१/२०२१/एस/8273 दिनांक : 9/5/24

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ३०३४/२०२२**
**बोर्ड क्र.११**

श्री.अशोक विश्वनाथ नवघरे,
रा.सिंचन नगर, परभणी ... अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.३०.०३.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे हे राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१२.०१.२०२२ रोजीच्या ऑनलाईन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, १. १९ (३) प्रमाणे दाखल अपिलांची वर्षानुसार संख्या, २. त्रुटीमधील अपिलांची संख्या (कारणे), ३. सन २०१८ जानेवारी पासून त्रुटीतील अर्जाबद्दल पुर्तमा करण्यासंबंधी अपिलकारास केलेला पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती, ४. त्रुटी काढण्यासंबंधी सर्व नियम व अटी व शासन निर्णयाच्या छायांकित प्रती, अशी माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाला प्रतिसाद देताना चुकीचा अर्थ काढुन मागणी केलेली माहिती अनेक विषयाची असल्याचा समज केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.१ ची माहिती देय होत असल्याचे कळवून ही माहिती संकेतस्थळावर घेण्याचे सुचित केलेले आहे. वास्तविक मुद्दा क्र.१ ची माहिती संख्यात्मक असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. कारण संकेतस्थळावर माहिती घेण्याचा प्रयत्न केला परंतू सदर माहिती संकेतस्थळावर मिळून आलेली नाही. तसेच मागणी केलेली पूर्ण माहिती ही एका विषयाशी म्हणजे अपिलाशी संबंधित असल्यामुळे मागणी केलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, शासन राजपत्र दि.१६.०१.२०१२ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३-क नुसार एक विनंती अर्ज केवळ एका विषयाशी संबंधित असणे आवश्यक असल्यामुळे एका विषयाची माहिती म्हणजे मुद्दा क्र.१ ची माहिती www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वार्षिक अहवाल या सदराखाली उपलब्ध असुन ती संकेतस्थवरुन प्राप्त करुन घ्यावी व इतर माहितीकरिता स्वतंत्र अर्ज सादर करावे, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयाची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्यामुळे अपिलार्थी यांनी संकेतस्थळावर संपर्क करुन माहिती प्राप्त करुन घेणे उचित ठरेल. अपिलार्थी यांनी मुद्दा क्र.१ बाबत नेमका कालावधी नमूद

केलेला नाही. या उपर अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आता आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नकार, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा अधिक विषयाशी निगडित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील प्रथम विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती देय होत आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती संकेतस्थळावर असल्याचे अपिलार्थीस कळविलेले आहे. मात्र सदर माहिती संकेतस्थळावर मिळुन येत नसल्याचे अपिलार्थी यांनी अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद एका विषयाची (प्रथम विषय) म्हणजे मुद्दा क्र.१ च्या संदर्भात सन २०१८ पासुनची संख्यात्मक माहिती (१९ (३) नुसार आयोगाकडे दाखल व्दितीय अपिलांची संख्या), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. ३०३४/२०२२/एस/ 8274 दिनांक :- 9/5/24

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १९१०/२०२४
बोर्ड क्र.१२

श्री.प्रदिप बाबुलाल भारुका,
भारुका मेडिकल, मने रोड, कन्नड, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१३.०३.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२०.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, अपील क्र.१३७२/२०१७, निर्णय दि.१२.०५.२०२० बाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१७.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, मा.राज्य मुख्य माहिती आयोग, मुंबई यांचे परिपत्रक क्र.मुमाआ-२००८/प्र.क्र.११९/०१, दि.११.०८.२०१४ नुसार व्दितीय अपील क्र.१३७२/२०१७ मधील प्रकरणातील अभिलेखाचे निंदणीकरण करण्यात आले असल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१८.१०.२०२३ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात नमूद अपिलाच्या संचिकेचे निंदणीकरण करण्यात आले असल्यामुळे माहिती उपलब्ध नाही. म्हणून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१७.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन निंदणीकरण करण्यात आले असल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जात नमूद व्दितीय अपील निर्णयामध्ये निर्देशित केलेल्या बाबीसंदर्भात अनुपालनाबाबत माहिती हवी आहे. अशी माहिती तहसिल कार्यालय, कन्नड या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे आवश्यक माहितीकरिता तहसिल कार्यालय, कन्नड यांचेकडे संपर्क करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे देखील अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास

टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरत असल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२३.११.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. १९१०/२०२४/एस/ 8275 दिनांक : 9/5/24

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १८७३/२०२४
बोर्ड क्र.१३

श्री.संतोष शंकरराव वाघलव्हाळे,
रा.चौका, ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.११.०३.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट अपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे हे राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०५.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, व्दितीय अपील क्रं.११६५२/२०२१, दाखल दि.२३.११.२०२१ ची प्रमाणित प्रत, दि.०२.११.२०२३ रोजीचे सुनावणीबाबत कार्यालयाने पाठविलेल्या सुनावणी नोटीसच्या प्रमाणित प्रती, न्यायनिर्णयाची प्रमाणित नक्कल, अशी माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्यांचेशी संबंधित व्दितीय अपील क्र.११६५२/२०२१ वर दि.०२.११.२०२३ रोजी आयोगासमोर सुनावणी झालेल्या प्रकरणात सुनावणी नोटीस व निर्णयाची प्रत मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहितीचा अर्ज सादर केला त्यावेळी संबंधित व्दितीय अपिलामध्ये सुनावणीनंतर कार्यवाही पूर्ण झाली नसल्यामुळे दि.११.०१.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे, सुनावणीनंतरची कार्यवाही प्रगतीपथावर असुन ती पूर्ण होताच त्या संदर्भातील आदेश / निर्णय विहित मार्गाने उपलब्ध करुन देण्याची तजविज ठेवण्यात आलेली आहे, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात व्दितीय अपिलाची सद्यस्थिती अवगत केली असता असे निदर्शनास आलेले आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद व्दितीय अपिलाच्या निर्णय प्रत जावक शाखेकडुन निर्गमित करण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन

माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत, माहिती अर्जाव्दारे हव्या असलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयीन कामकाजाचे दिवस विचारात घेऊन कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित माहितीचे अवलोकन करावे. अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहिल्यानंतर वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य व्यक्तिश: उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह कळविण्यात यावे. तसेच अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे नमूद कालावधीत ते अवलोकनास्तव उपस्थित न राहिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहितीचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.वि.अ.१८७३/२०२४/एस/ 8276 दिनांक : 9/5/24

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १९५/२०२१, ३४९/२०२२, ३५०/२०२२,
३६५/२०२२ व १५८९/२०२२ (०५)**

**बोर्ड क्र.१४ ते १८**

श्री.पंढरीनाथ बाबाराव आरदवाड, — अपिलार्थी
व्दारा- प्रेमपंढरी निवास, अटकळीकर रो-हाऊस क्र.१, शिवनेरी नगर,
रामपूर रोड, देगलूर, ता.देगलूर, जि.नांदेड ४३१७१७

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर.

**(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.११.०३.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे हे राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १४ | १४.१०.२०२० | मी पाठविलेले पत्र दि.०६.१०.२०२० नुसार अपील क्र.६७३८/१८, आदेश क्र.२०६१, दि.१४.०२.२०१९ या आदेशातील जन माहिती अधिकारी यांच्या रोजनाम्याची प्रत मिळणेबाबत, |
| १५ | २५.१०.२०२१ | दि.१८.१०.२०२१ ला पाठविलेले व आपल्या कार्यालयाला दि.२०.१०.२०२१ ला मिळालेल्या पत्रावर झालेल्या कार्यालयीन कार्यवाहीची प्रतिलिपी प्रत साक्षांकित करुन मिळणेबाबत, |
| १६ | ०३.०७.२०२० | अ.क्र.४९३८/१८, दाखल दि.२०.०८.२०१८ (सुनावणी दि.१५.०९.२०१८ चा स्थिती अहवाल द्यावा, |
| १७ | २५.१०.२०२१ | दिनांक १८.१०.२०२१ ला पाठविलेले व आपल्या कार्यालयाला दि.२०.१०.२०२१ ला मिळालेल्या पत्रावर झालेल्या कार्यालयीन कार्यवाहीची प्रतीलिपी प्रत साक्षांकित करुन मिळणेबाबत, |
| १८ | ०८.११.२०२१ | दि.३०.०८.२०२१ ला पाठविलेले पत्र जे आपल्या कार्यालयास दि.०२.०९.२०२१ ला मिळाले आहे, त्या पत्रावर झालेल्या कार्यालयीन कार्यवाहीची प्रतिलिपी प्रत साक्षांकित करुन मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती समाधानकारक मिळालेली नाही. म्हणून ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, बोर्ड क्र.१४ मधील अपिलार्थी माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अपिलाच्या संचिकेचे निंदणीकरण करण्यात आले असल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. बोर्ड क्र.१५ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२४.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, तक्रार क्र.९६०/२०२१/नांदेड व तक्रार क्र.९५९/२०२१/नांदेड या दोनही तक्रार एकच असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. बोर्ड क्र.१६ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२१.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अपिलाच्या संचिकेचे निंदणीकरण करण्यात आले असल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळवून निर्णयाची प्रत संकेतस्थळावरुन घेण्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. बोर्ड क्र.१७ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२४.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी यांनी पाठविलेले पत्राचा आवक क्रमांक १८१२६ असल्याचे व त्याचा तक्रार क्रमांक ९५९/२०२१/नांदेड असा असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तसेच बोर्ड क्र.१८ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने, आयोगाने व्दितीय अपिलावर / तक्रार अर्जावर दिलेल्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याची तरतुद माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मिळालेली माहिती समजण्यास कठीण / अपिलीय अधिकारी यांनी दिलेला आदेश असमाधानकारक / दिशाभूल करणारी माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचे अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत, माहिती अर्जाव्दारे हव्या असलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयीन कामकाजाचे दिवस विचारात घेऊन कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करावे. अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहिल्यानंतर वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांचे माहितीचा अर्ज विचारात घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य व्यक्तिश: उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह कळविण्यात यावे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (दुसरी सुधारणा) २०१२ नुसार माहितीचे अवलोकन अपिलार्थी यांना व्यक्तिश: अनुज्ञेय राहील. प्रतिनिधीस अनुज्ञेय राहणार नाही. तसेच अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे नमूद कालावधीत ते अवलोकनास्तव उपस्थित न राहिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहितीचे अर्ज निकाली काढण्यात यावे.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. १९५/२०२१, ३४९/२०२२, ३५०/२०२२, ३६५/२०२२ व १५८९/२०२२/एस/-8277 दिनांक :- 9/5/24

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - २२१२, २२२५ ते २२२७/२०२२,
७९८७/२०२१, २३२१/२०२४ व २३२२/२०२४ (०७)
बोर्ड क्र.१९ ते २५

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके, — अपिलार्थी
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्ले धारुर, ता.किल्ले धारुर, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.११.०३.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये सात द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे हे राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या सात माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १९ | २४.०९.२०२१ | आपल्या कार्यालया अंतर्गत कार्यरत राज्य माहिती आयुक्त यांचे कार्य, कर्तव्य, अधिकारी व अपिलार्थी / तक्रारदार प्रती जबाबदारी व उत्तरदायित्व याची महाराष्ट्र शासन के.मा.अ. कायदा २००५ मधील कायद्यानुसार तसेच शासनाच्या शासन आदेश, परिपत्रक, नियमावली व विविध संबंधित कलमासह कायद्यातील त्याची विस्तृत लेखी स्वरुपात माहिती, |
| २० | २३.०९.२०२१ | आपल्या कार्यालय अंतर्गत कार्यरत एकूण शिपाई / सेवक / परिचर त्यांचे संपूर्ण नाव, नियुक्ती पध्दती स्थायी / अस्थायी त्यांचा नियुक्ती दिनांक व त्यांचे कार्य, कर्तव्य, अधिकार व येणाऱ्या अपिलार्थी प्रती उत्तरदायित्व तसेच कार्यालय प्रती जबाबदारी याची म.शासनाच्या अध्यादेश, परिपत्रक व नियमावली विविध संबंधित तसेच कायद्यातील कलमासह माहिती, |
| २१ | २१.०९.२०२१ | व्दितीय अपील क्र.३०७१/२०१७ सुनावणी दि.०३.०३.२०१८ निर्णय दि.१३.०५.२०२० जावक क्र.११०६९ निर्गमित दि.१६.१०.२०२० अपिलार्थीस पोस्टाने दि.०१.०३.२०२१ रोजी प्राप्त झाल्यास यास जबाबदार असणारेची (नावे) माहिती तसेच कलम १८ अंतर्गत तक्रार (अर्ज) केल्यास राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद स्वीकार करुन त्याची सुनावणी घेऊन |

| | | |
|---|---|---|
| | | निर्णय पारित करणार याची पुराव्यानिशी लेखी माहिती मिळणेबाबत, |
| २२ | २१.०९.२०२१ | व्दितीय अपील क्र.६०५३/२०१८ आदेश दि.१४.११.२०१८ रोजीचे आदेश निर्णय दि.२०.०५.२०२० संबंधित निकालामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अजूनही अंदाजे तीन वर्षानंतरही माहिती दिलेली नाही तसेच उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांनी कोणत्या नियम व निकषानुसार पंचवीस हजार रु. दंड करणे सोडुन काही दंड नाही करण्याचे पुराव्यानिशी लेखी साक्षांकित करुन मिळणेबाबत, |
| २३ | १६.०३.२०२१ | मा.राज्य माहिती आयोग, म.राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांनी व्दितीय अपील / तक्रार अर्जावरील सुनावणीमध्ये आदेशित निर्णयात शास्ती अंतिम केलेल्या जन माहिती अधिकारी कडुन शास्ती किती कालावधीमध्ये वसुली करुन त्याची संबंधित कर्मचारीच्या सेवा पुस्तिका / सर्व्हिस बुकमध्ये नोंदणी करणे बंधनकारक आहे याची पुराव्यानिशी लेखी माहिती, |
| २४ | १५.०१.२०२४ | आपल्या कार्यालया अंतर्गत कार्यरत कर्मचारी / अधिकारी श्रीमती राजश्री मोरे यांची रामाआ, खंडपीठ छ.संभाजीनगर येथे एकूण प्रतिनियुक्तीचा कालावधी, आदेश, नेमणूकीचे पत्र तसेच रुजू अहवाल व धारण पदावरील कार्य, कर्तव्य, हक्क / अधिकारी तसेच अर्जदार, अपिलार्थी व तक्रारदार (जनतेप्रती) उत्तरदायित्व याची लेखी पुराव्यानिशी साक्षांकित करुन माहिती, |
| २५ | २५.०१.२०२४ | १. दि.०२.१०.२००५ ते आपण माहिती देईपर्यंत आपल्या कार्यालयाने कें.मा.अ. अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (क) व (ख) प्रमाणे वर्षनिहाय स्वयंप्रकाशित केलेल्या ०१ ते १७ बाबीची माहिती लेखी साक्षांकित करुन मिळावी,<br>२. वरील मुद्दा क्र.१ ची माहिती आपल्या कार्यालयाने ज्या वेबसाईट / संकेतस्थळावर वर्षनिहाय स्वयंप्रेरणेने प्रकाशित केली ती वेबसाईट मिळावी,<br>३. वरील मुद्दा क्र.०१ व ०२ चे कर्तव्याचे वर्षनिहाय अनुपालन आपल्या कार्यालयाकडुन झाले नसल्यास त्यास जबाबदार अधिकारी यांचे संपूर्ण नाव, पद व पत्ता (कार्यालयात नोंद असलेला तत्कालीन व वर्तमान) यांची यादी मिळावी. |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, बोर्ड क्र.१९ व २० मधील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलबध असल्याचे संकेतस्थळासह अपिलार्थी यांना कळविलेले आहे. बोर्ड क्र.२१ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे अपिलार्थी यांना कळवून कलम १९ व १८ च्या प्रक्रियेबाबत मुख्य माहिती आयुक्त, मणिपूर व इतर विरुध्द माणिपूर राज्य शासन व इतर सिव्हील अपील क्र.१०७८७-१०७८८/२०११ (slp (c)) क्रमांक ३२७६८-३२७६९/२०१० या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दि.१२.१२.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे लक्ष वेधलेले आहे. बोर्ड क्र.२२ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.०९.२०२१, अपील क्र.६०५३/२०१८ मध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांना कलम ७ (१) च्या भंगाबाबत खुलासा सादर करणेबाबत आयोगाने आदेशित केले नसल्यामुळे कलम २० (१) नुसार कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे व माहिती अर्जातील इतर वर्णन हे काल्पनिक स्वरुपाचे असुन कलम २ (च) नुसार अभिलेख स्वरुपात उपलब्ध नसल्यामुळे ते उपलब्ध करुन देणे अशक्य असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविलेले आहे. बोर्ड क्र.२३ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती निरंक असल्याचे अपिलार्थी यांना कळवून कलम १९ (७) नुसार आयोगाकडील निर्णय बंधनकारक असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अवगत केलेले आहे. बोर्ड क्र.२४ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे मागणी केलेली माहिती कलम ८ (१) (त्र) नुसार देता येणार नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच बोर्ड क्र.२५ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असुन ती संकेतस्थळावर प्राप्त करुन घेण्याचे संकेतस्थळासह अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२१ रोजी तीन दि.०२.११.२०२१ रोजी एक दि.११.०८.२०२१ रोजी एक दि.१४.०२.२०२४ रोजी दोन असे सात प्रथम अपील दाखल केलेले आहेत. अपिलार्थी यांच्या या सर्व प्रथम अपिलावर अनुक्रमे दि.०७.१२.२०२१ (०४), दि.१०.०५.२०२१ (०१) व दि.२७.०२.२०२४ (०२) रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अस्पष्ट माहिती / माहिती मिळाली नाही / निरर्थक माहिती / निरर्थक माहिती / माहिती मिळालेली नाही / माहिती मिळालेली नाही / माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या सात प्रथम अपिलावर दि.०७.१२.२०२१ (०४), दि.१०.०५.२०२१ (०१) व दि.२७.०२.२०२४ (०२) रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह सात व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. २२१२, २२२५ ते २२२७/२०२२, ७९८७/२०२१, २३२१/२०२४ व २३२२/२०२४/एस/-8502 दिनांक : 12/5/24

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४३६५/२०२४
बोर्ड क्र.२६

श्री.मोतीराम गयबु काळे,
रा.जानापुरी, पो.वडेपुरी (एस.आर.टी.), ता.लोहा, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप सचिव,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २९.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१८.०४.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, श्रीमती एम.एम.परदेशी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, श्री.रा.चो.सरवदे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१५.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, दि.२४.१०.२०२३, दि.१७.१०.२०२३, दि.१९.१२.२०२३ व दि.०२.०१.२०२४ रोजी आयोगासमोर सुनावणी झालेल्या अपिलार्थी यांच्याशी संबंधित व्दितीय अपिलाबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, व्दितीय अपिलावर नमूद दिनांकास सुनावणी झालेली असुन त्या संदर्भातील कार्यवाही प्रगतीपथावर आहे व कार्यवाही पूर्ण होताच त्या संदर्भातील आदेशाच्या प्रती विहित मार्गाने उपलब्ध करुन देण्याची तजविज ठेवण्यात आली असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दि.१५.०२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२४.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, सुनावणीनंतरची कार्यवाही पूर्ण होताच त्या संदर्भातील निर्णयाची प्रत विहित मार्गाने उपलब्ध करुन देण्याची तजविज ठेवण्यात आली असल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात दि.१७.१०.२०२३ व दि.२४.१०.२०२३ रोजी सुनावणी झालेल्या व्दितीय अपिलांचे निर्णय जावक शाखेकडुन निर्गमित करण्यात आलेले आहेत. मात्र दि.१९.१२.२०२३ व दि.०२.०१.२०२४ रोजी सुनावणी झालेल्या व्दितीय अपिलाबाबत सुनावणीनंतरची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यामुळे या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देता येत नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरत असल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२२.०३.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. ४३६५/२०२४/एस/ 8503 दिनांक : 12/5/24